# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 06.10.2023 वार – शुक्रवार

---

**आयुष्मान भारत गोल्डन कार्ड**

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेता यावा यासाठी सर्व पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी तसंच आयुष्मान भारत गोल्डन कार्ड काढून घ्यावीत, असं आवाहन पुण्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर राजेश देशमुख यांनी केलं आहे. 2011 च्या जनगणना यादीतल्या आकडेवारीनुसार पुणे जिल्ह्यात ग्रामीण आणि शहरी भागात मिळून 4 लाख 57 हजार 28 कुटुंबे या योजनेचे पात्र लाभार्थी आहेत. आतापर्यंत केवळ 4 लाख 26 हजार 373 लाभार्थ्यांनी आयुष्मान भारत गोल्डन कार्ड काढलं आहे.

**मुख्यमंत्री निर्देश**

नांदेड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर इथल्या शासकीय रुग्णालयातील मृत्यू प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील सर्व महापालिकांच्या प्रमुखांची बैठक घेऊन आढावा घेतला. त्यानंतर पुणे महापालिकेच्या रुग्णालयातल्या स्थितीवर नजर ठेवण्यासाठी दोन अधिकाऱ्यांची समिती स्थापन केली आहे. हे अधिकारी रुग्णालयातील स्वच्छता, औषधांचा साठा, डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती, उपकरणे सुस्थितीत आहेत की नाहीत? याची दैनंदिन तपासणी करून त्याचा अहवाल शासनाला सादर करणार आहेत.

**राजीव गांधी रुग्णालय**

पुणे महापालिकेच्या येरवडा इथल्या राजीव गांधी रुग्णालयातील प्रलंबित समस्या आणि अत्यावश्यक सोयी सुविधांसाठी रुग्णालय प्रशासनाच्या वतीने महापालिका आयुक्त आणि आरोग्य प्रमुखांना विनंती करण्यात आली होती. त्यानुसार अतिरिक्त महापालिका आयुक्त विकास ढाकणे यांनी राजीव गांधी रुग्णालयाची नुकतीच पाहणी केली. तसंच या ठिकाणी आवश्यक सोयीसुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागांना सूचना दिल्या.

**रघुनाथ माशेलकर कार्यक्रम**

तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं देणगीदार आणि गरजवंत ही दरी मिटवत सामाजिक काम झाल्यास सामाजिक क्षेत्रात चमत्कार वाटावा असं मोठं काम उभं राहू शकतं असा विश्वास ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉक्टर रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केला. आर्टिस्ट्री या संस्थेतर्फे वेगवेगळ्या क्षेत्रातील सामाजिक संस्थांच्या कार्याचं प्रदर्शन करणाऱ्या 'देणे समाजाचे' या सामाजिक उपक्रमाचं उद्घाटन आज पुण्यात डॉक्टर माशेलकर यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**पुनीत बालन गणेशोत्सव**

सण उत्सवासाठी मदत करणाऱ्या उद्योजकांवर कारवाईचा बडगा उगारल्याने उत्सवाला आर्थिक मदत करण्यास कोणी उद्योजक पुढे येणार नाहीत आणि सण, उत्सवाची परंपरा लोप पावेल, असा आक्षेप घेत पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी उद्योजक पुनीत बालन यांना पाठिंबा जाहीर केला आहे. नुकत्याच झालेल्या गणेशोत्सव काळात शहरात विनापरवानगी जाहिरात फलक लावल्याप्रकरणी पुनीत बालन यांच्यावर महापालिकेनं दंडाची कारवाई केली होती. त्यानंतर ही प्रतिक्रिया उमटत आहे. दुसरीकडे, जाहिरात फलकासाठीची नियमावली आणि शहराचं विद्रुपीकरण या मुद्द्यांवर चर्चा व्हायला हवी असं मत शहरातील काही सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांनी व्यक्त केलं आहे.

**<u>वीजदर</u>**

इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी महावितरण कडून स्वतंत्र वीजमीटर घेतलं तर त्यासाठी सवलतीचा वीजदर दिला जाणार आहे. चार्जिंगसाठी कितीही वीज वापरली तरी, प्रतियुनिटचा दर तोच राहणार आहे. या योजने अंतर्गत आतापर्यंत पुणे-पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागात मिळून सुमारे 200 स्वतंत्र वीजमीटर महावितरणकडून देण्यात आले आहे. त्यामध्ये वैयक्तिक वीजमीटर घेणाऱ्यांची संख्या कमी आहे. नागरिकांनी या योजनेचा फायदा घ्यावा. असे आहवान पुणे महावितरण जनसंपर्क अधिकारी निशिकांत राऊत यांनी केलं आहे.

**<u>क्रिकेट संघटना</u>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या सईद मुश्ताक अली टी ट्वेंटी क्रिकेट हंगामाला 16 ऑक्टोबर पासून सुरुवात होत आहे. यासाठी महाराष्ट्राचा वरिष्ठ गटाचा पुरुष संघ जाहीर झाला आहे. महाराष्ट्राच्या संघाचे कर्णधारपद पुण्याच्या केदार जाधव याच्याकडे सोपविण्यात आलं आहे.

**<u>कब्बडी स्पर्धा</u>**

पुणे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत किशोरी गटात डॉक्टर पतंगराव कदम संघाने विजेते पद पटकावलं. किशोर गटात अंतिम फेरीत श्रीकृष्ण संघ अजिंक्य ठरला. पुरुषांच्या अंतिम सामन्यात सतेज बाणेर अ संघ अजिंक्यपदाचा मानकरी ठरला तर महिलांच्या अंतिम सामन्यात एम.एच.स्पोर्टस् संघाने जेते पदावर आपलं नाव कोरलं.

**<u>ओपन जीम</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांना वसतिगृहातच व्यायाम करता यावा यासाठी दोन्ही वसतिगृहात खुली व्यायामशाळा उभारण्यात आली आहे. त्याचं उद्घाटन काल कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी प्र कुलगुरु पराग काळकर यांच्यासह विद्यापीठाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 33 तर किमान तापमान 19 अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं. उद्याही साधारण असंच तापमान राहील असा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तवला आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**